पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc@mah.gov.in

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ /२०२४ दिनांक - /०८/२०२४

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

दिनांक १७/०८/२०२४ रोजी मा. व्हि.व्हि.आय.पी यांचा श्री. छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल बालेवाडी येथे दौरा असल्यामुळे बालेवाडी स्टेडीयम जवळील व म्हाळुंगे गाव परिसरामधील जड अवजड वाहतुक सुरळीत रहाणेकरीता व वाहतूक कोंडी टाळणेकरीता जड अवजड वाहनांचे वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

## हिंजवडी वाहतूक विभाग

- चांदे-नांदे-म्हाळुंगे गाव ते राधा चौक व राधा चौक ते म्हाळुंगे गाव येण्या-जाण्यास प्रवेश बंद राहील.

➢ पर्यायी मार्ग :- १) चांदे-नांदे येथुन येणारी जड अवजड वाहने ही गोदरेज सर्कल येथुन डावीकडे वळुन माण मार्गे हिंजवडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) बालेवाडी जकात नाका व बाणेर हद्दितुन येणारी जड अवजड वाहने ही राधा चौकातुन उजवीकडे वळुन वाकड नाका मार्गे हिंजवडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) सुस ब्रिज कडुन राष्ट्रीय महामार्गावरुन न्याती शोरुम समोरील पंक्चर येथुन राधा चौकाकडे येणारी जड अवजड वाहने ही बेंगलोर-मुंबई हायवेने वाकड नाका मार्गे हिंजवडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

- बालेवाडी स्टेडीयम म्हाळुंगे कडील मेनगेट समोरील रस्ता हा शितळाई देवी चौक (पुणेरी स्वीट) ते म्हाळुंगे पोलीस चौकी पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांकरीता बंद राहील.

➢ पर्यायी मार्ग:-१)चांदे- नांदे व म्हाळुंगे गावातुनराधाचौकाकडे जाणारी वाहने ही शितळाईदेवी चौक (पुणेरीस्वीट) येथुन उजवीकडे वळुन म्हाळुंगे पोलीसचौकी येथुन पुढे राधा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) राधा चौकातुन म्हाळुंगे गावाकडे जाणारी वाहने ही म्हाळुंगे पोलीस चौकी येथे डावीकडे वळुन पुढे म्हाळुंगे गाव, चांदे- नांदे व पुढेइच्छित स्थळी जातील.

वरील वाहतुक बदल दि.१७/०८/२०२४ रोजी ०६/०० वाजेपासुन रात्रौ २०.३० वाजेपावेतो आवश्यकतेनुसार जड अवजड वाहनांना (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून) प्रवेश बंद करण्यात येत आहे.

तरी वाहन चालकांनी नमुद केलेप्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करावा.

13.08.24

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी हिंजवडी वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड
२/- अधिसुचनेचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटींक करून वाहनचालकांना मार्गदर्शन करणारे फलक लावावे.

Scanned with OKEN Scanner